0 7 JAN 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ. कोल्हापूर

# दिमाखदार शोभायात्रेने 'शिवस्पंदन' महोत्सवाला प्रारंभ

## विविध विषयांवर प्रबोधन; छत्रपती शिवरायांसह राजर्षी शाहू महाराज, फुले दांपत्य अवतरले

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ६ : शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी विकास मंडळाच्या तीन दिवसीय शिवस्पंदन सांस्कृतिक महोत्सवाला आज सकाळी दिमाखदार शोभायात्रेने जल्लोषात प्रारंभ झाला. महोत्सवात विद्यापीठाच्या विविध अधिविभागांतील विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले आहेत.

या शोभायात्रेच्या निमित्ताने छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांच्यासह राज कपूर, नर्गिस, दादा कोंडके, उषा चव्हाण, व्ही. शांताराम, सूर्यकांत मांढरे, जयश्री गडकर, सिमी गरेवाल आदी कलाकारांच्या व्यक्तिरेखाही विद्यापीठाच्या प्रांगणात अवतरल्या. त्याखेरीज सहभागी अधिविभागांच्या संघांनी अतिशय कल्पकतेने प्रबोधनपर विषयांचे सादरीकरण शोभायात्रेद्वारे केले. शेतकरी, महाराष्ट्राची लोकसंस्कृती, सण व परंपरा, भारताच्या विविध प्रांतांमधील नागरिकांच्या वेशभूषा, आजची मल्टिटास्किंग महिला इत्यादींचेही दर्शन घडविण्यात आले. विद्यार्थ्यांनी केवळ वेशभूषेवरच समाधान न मानता शेतकरी आत्महत्या, पर्यावरणाचे संरक्षण, शिक्षण, मतदार जागृती व लोकशाही, वास्तव आणि आभासी जगातील फरक इत्यादींविषयीही सादरीकरण करून लक्ष वेधून घेतले.



कोल्हापूर : शिवस्पंदन महोत्सवांतर्गत निघालेल्या शोभायात्रेत विविध महामानव व भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या पेहराव्यातील खेळाडू.

दरम्यान, सकाळी विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करून शोभायात्रेस प्रारंभ करण्यात आला. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले, डॉ. प्रल्हाद माने, मीना पोतदार, प्रभंजन माने, विनोद ठाकूरदेसाई, कविता वड्राळे, संतोष सुतार, प्रमोद कसबे, मदनलाल शर्मा, संग्राम भालकर, सुरेखा अडके यांच्या उपस्थितीत शोभायात्रेचे उद्घाटन झाले. मुख्य इमारतीपासून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास प्रदक्षिणा घालून हलगी व ढोल-ताशाच्या गजरात शोभायात्रा काढण्यात आली. उद्घाटन समारंभानंतर राजर्षी शाहू सभागृहात दिवसभर सुगम गायन, एकल लोकवाद्य वादन, समूहगीत स्पर्धा, लोकवाद्य वादन ताल उत्सव झाला. त्याचप्रमाणे रांगोळी आणि स्थळचित्रण स्पर्धा संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागात पार पडल्या.

### महोत्सवात आज

बुधवारी (ता. ७) महोत्सवात राजर्षी शाहू सभागृह येथे मूकनाट्य, नकला आणि लघुनाटिका या स्पर्धा होणार आहेत.

### विचारांची सौहार्दपूर्ण देवाणघेवाण अपेक्षित

■ शोभायात्रेनंतर विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात शिवस्पंदन महोत्सवाचे उदघाटन प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. 'विद्यार्थ्यांनी विद्यापीठात शिक्षण घेणे आवश्यकच आहे. तथापि, त्यापलीकडे जाऊन सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून एकमेकांशी विचारांची सौहार्दपूर्ण देवाणघेवाण करावी, हाच हेतू शिवस्पंदनच्या आयोजनामागे असल्याचे डॉ. जाधव यांनी सांगितले. 'विद्यार्थ्यांनी शोभायात्रेत केलेले सादरीकरण हे त्यांचे समाजभान जागृत असल्याचे निदर्शक आहे', असे डॉ. शिंदे यांनी सांगितले.

Scanned with OKEN Scanner

07 JAN 2026

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



शिवाजी विद्यापीठात मंगळवारी झालेल्या शिवस्पंदन महोत्सवातील शोभायात्रेत प्र. कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्यासह संयोजन समिती सदस्य आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले होते.

# शोभायात्रेने शिवस्पंदन महोत्सवाला प्रारंभ

## शिवाजी विद्यापीठात सांस्कृतिक कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळाने आयोजित केलेल्या तीन दिवसीय शिवस्पंदन सांस्कृतिक महोत्सवाला मंगळवारी दिमाखदार शोभायात्रेने मोठ्या जल्लोषाच्या वातावरणात प्रारंभ झाला. महोत्सवात विद्यापीठाच्या विविध विभागांतील विद्यार्थी-विद्यार्थिनी उत्स्फूर्तपणे सहभागी झाल्या होत्या.

मुख्य इमारतीपासून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास प्रदक्षिणा घालून हलगी व ढोलताशाच्या गजरात शोभायात्रा काढण्यात आली. मुख्य इमारतीसमोर सहभागी संघांनी आपापल्या विषयाच्या अनुषंगाने देखणे सादरीकरण केले. या शोभायात्रेत छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांच्यासह राज कपूर, नर्गीस, दादा कोंडके, उषा चव्हाण, व्ही. शांताराम, सूर्यकांत मांढरे, आदी कलाकारांच्या वेशभूषा विद्यार्थ्यांनी साकारल्या. विद्यापीठातील परदेशी विद्यार्थ्यांनीही शोभायात्रेत भाग घेतला.

### लोकवाद्य, तालवाद्यांना प्रतिसाद

उद्घाटनानंतर राजर्षी शाहू सभागृहात दिवसभर सुगम गायन, एकल लोकवाद्य वादन, समूहगीत स्पर्धा आणि लोकवाद्य वादन ताल उत्सव झाला. यावेळी रांगोळी आणि स्थळचित्रण स्पर्धा संगीत व नाट्यशास्त्र विभागात पार पडल्या.

मंगळवारी सकाळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करून शोभायात्रेस प्रारंभ झाला. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले, डॉ. प्रल्हाद माने, डॉ. मीना पोतदार, डॉ. प्रभंजन माने, डॉ. विनोद ठाकूर देसाई, डॉ. कविता वड्राळे, डॉ. संतोष सुतार आणि डॉ. प्रमोद कसबे यांच्या उपस्थितीत शोभायात्रेचे उद्घाटन झाले. राजर्षी शाहू सभागृहात शिवस्पंदन महोत्सवाचे प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते औपचारिक उद्घाटन झाले. यावेळी डॉ. जाधव आणि कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. तानाजी चौगुले यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रमोद कसबे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. प्रल्हाद माने यांनी आभार मानले. यावेळी डॉ. मदनलाल शर्मा, संग्राम भालकर, सुरेखा अड्के उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner

07 JAN 2026 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर






# आकर्षक शोभायात्रेने शिवस्पंदन सुरू

## शिवाजी विद्यापीठामध्ये तीन दिवस सांस्कृतिक मेजवानी

**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळाच्या वतीने आयोजित तीन दिवसीय शिवस्पंदन सांस्कृतिक महोत्सवाला मंगळवारी सकाळी अत्यंत आकर्षक व दिमाखदार शोभायात्रेने प्रारंभ झाला. महोत्सवात विद्यापीठाच्या विविध अधिविभागांतील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग दर्शवला आहे.**

या शोभायात्रेच्या निमित्ताने छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांच्यासह राज कपूर, नर्गीस, दादा कोंडके, उषा चव्हाण, व्ही. शांताराम, सूर्यकांत मांढरे, जयश्री गडकर, सिमी गरेवाल आदी कलाकारांच्या व्यक्तिरेखाही विद्यापीठाच्या प्रांगणात अवतरल्या. त्याखेरीज सहभागी अधिविभागांच्या संघांनी अतिशय कल्पकतेने प्रबोधनपर विषयांचे सादरीकरण शोभायात्रेद्वारे केले. शेतकरी, महाराष्ट्राची लोकसंस्कृती, सण व परंपरा, भारताच्या विविध प्रांतांमधील नागरिकांच्या वेशभूषा, आजची मल्टिटास्किंग महिला इत्यादींचेही दर्शन घडवण्यात आले. विद्यार्थ्यांनी केवळ वेशभूषेवरच समाधान न मानता शेतकरी आत्महत्या, पर्यावरणाचे संरक्षण, शिक्षण, मतदार जागृती व लोकशाही, वास्तव आणि आभासी जगातील फरक इत्यादींविषयीही सादरीकरण करून लक्ष वेधून घेतले. विद्यापीठात शिकणाऱ्या परदेशी विद्यार्थ्यांनीही शोभायात्रेत आवर्जुन सहभाग घेतला.

सकाळी विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करून शोभायात्रेस प्रारंभ करण्यात आला. शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले, डॉ. प्रल्हाद माने, डॉ. मीना पोतदार, डॉ. प्रभंजन माने, डॉ. विनोद ठाकूरदेसाई, डॉ. कविता वड्राळे, डॉ. संतोष सुतार, डॉ. प्रमोद कसबे यांच्या प्रमुख उपस्थितीत शोभायात्रेचे उद्घाटन करण्यात आले. मुख्य इमारतीसमोर सहभागी संघांनी आपापल्या विषयाच्या अनुषंगाने अत्यंत देखणे सादरीकरण केले.

शोभायात्रेनंतर राजर्षी शाहू सभागृहात महोत्सवाचे प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते औपचारिक उद्घाटन करण्यात आले. प्र-कुलगुरू डॉ. जाधव म्हणाल्या, विद्यार्थ्यांनी विद्यापीठात शिक्षण घेणे आवश्यकच आहे. त्यापलीकडे जाऊन सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून एकमेकांशी विचारांची सौहार्दपूर्ण देवाण-घेवाण करावी, हाच हेतू 'शिवस्पंदन'च्या आयोजनामागे आहे. सांस्कृतिक कार्यक्रमातून सादरकर्त्यांबरोबरच प्रेक्षकांनाही प्रेरणा आणि ऊर्जा मिळते.

कुलसचिव डॉ. विलास शिंदे म्हणाले, विद्यार्थ्यांनी शोभायात्रेत केलेले सादरीकरण हे त्यांचे समाजभान जागृत असल्याचे निदर्शक आहे. निरोगी मन आणि शरीर यासाठी कला ही महत्त्वाची ठरते. सादरकर्त्याला दाद देणे ही सुद्धा एक कला आहे. ती मनापासून जोपासली पाहिजे.

यावेळी डॉ. तानाजी चौगुले यांनी स्वागत, डॉ. प्रमोद कसबे यांनी सूत्रसंचालन केले. समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांनी आभार मानले. यावेळी डॉ. मदनलाल शर्मा, संग्राम भालकर, सुरेखा अडके आदी उपस्थित होते.

### स्पर्धांना उत्तम प्रतिसाद

उद्घाटन समारंभानंतर राजर्षी शाहू सभागृहात दिवसभर सुगम गायन, एकल लोकवाद्य वादन, समूहगीत स्पर्धा आणि लोकवाद्य वादन ताल उत्सव झाला. रांगोळी आणि स्थळचित्रण स्पर्धा, संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागात पार पडल्या. या स्पर्धांना विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

### आज महोत्सवात

बुधवार, दि. ७ रोजी राजर्षी शाहू सभागृह येथे मूकनाट्य, नकला आणि लघुनाटिका या स्पर्धा होतील. रसिकांनी त्यांचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

07 JAN 2026

जनप्रवास

# शोभायात्रेने 'शिवस्पंदन'ला प्रारंभ

## छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज, फुले दांपत्य, राज कपूर अवतरले

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळाच्या वतीने आयोजित तीन दिवसीय शिवस्पंदन सांस्कृतिक महोत्सवाला आज सकाळी अत्यंत आकर्षक व दिमाखदार शोभायात्रेने मोठ्या जल्लोषाच्या वातावरणात प्रारंभ झाला. महोत्सवात विद्यापीठाच्या विविध अधिविभागांतील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग दर्शविला आहे.

शोभायात्रेच्या निमित्ताने छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, यांच्यासह राज कपूर, नर्गीस, दादा कोंडके, उषा चव्हाण, व्ही. शांताराम, सूर्यकांत मांढरे, जयश्री गडकर, सिमी गरेवाल आदी कलाकारांच्या व्यक्तीरेखाही विद्यापीठाच्या प्रांगणात अवतरल्या. त्याखेरीज सहभागी अधिविभागांच्या संघांनी अतिशय कल्पकतेने प्रबोधनपर विषयांचे सादरीकरण शोभायात्रेद्वारे केले. शेतकरी, महाराष्ट्राची लोकसंस्कृती, सण व परंपरा, भारताच्या विविध प्रांतांमधील नागरिकांच्या वेशभूषा, आजची मल्टिटास्किंग महिला इत्यादींचेही दर्शन घडविण्यात आले. विद्यार्थ्यांनी केवळ वेशभूषेवरच समाधान मानता शेतकरी आत्महत्या, पर्यावरणाचे संरक्षण, शिक्षण, मतदार जागृती व लोकशाही, वास्तव आणि आभासी जगातील फरक इत्यादींविषयीही सादरीकरण करून लक्ष वेधून घेतले. विद्यापीठात शिकणाऱ्या परदेशी विद्यार्थ्यांनीही शोभायात्रेत आवर्जून सहभाग घेतला.



**शिवस्पंदन महोत्सवांतर्गत शिवाजी विद्यापीठात आयोजित शोभायात्रेत विविध महामानव आणि भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या पेहरावातील विद्यार्थी.**

आज सकाळी विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करून शोभायात्रेस प्रारंभ करण्यात आला. कुलसचिव डॉ. विलास शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले, डॉ. प्रल्हाद माने, डॉ. मीना पोतदार, डॉ. प्रभंजन माने, डॉ. विनोद ठाकूरदेसाई, डॉ. कविता वड्राळे, डॉ. संतोष सुतार आणि डॉ. प्रमोद कसबे यांच्या प्रमुख उपस्थितीत शोभायात्रेचे उद्घाटन करण्यात आले.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 JAN 2026

तरुण भारत



शोभायात्रेत विविध महामानव आणि भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या पेहराव्यातील विद्यार्थी.

# 'शिवस्पंदन' शोभायात्रेने महोत्सवाला प्रारंभ

## शिवाजी विद्यापीठ परिसर उत्साहात डुंबला

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळाच्या वतीने आयोजित तीन दिवसीय शिवस्पंदन सांस्कृतिक महोत्सवाला मंगळवारी रोजी दिमाखदार शोभायात्रेने उत्साही वातावरणात प्रारंभ झाला. महोत्सवात विद्यापीठाच्या विविध अधिविभागांतील विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग दर्शविला.

प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन करण्यात झाले. शोभायात्रेच्या निमित्ताने छत्रपती शिवाजी महाराज,

- **शिवाजी महाराज, शाहू महाराज, फुले दाम्पत्य, अभिनेते राज कपूरच्या वेशभूषेने भरला रंग**

छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, यांच्यासह राज कपूर, नर्गीस, दादा कोंडके, उषा चव्हाण, व्ही. शांताराम, सूर्यकांत मांढरे, जयश्री गडकर, सीमी गरेवाल आदी कलाकारांच्या व्यक्तीरेखाही विद्यापीठाच्या प्रांगणात अवतरल्या. त्याखेरीज सहभागी अधिविभागांच्या संघांनी अतिशय कल्पकतेने विषयांचे सादरीकरण शोभायात्रेद्वारे केले.

Scanned with OKEN Scanner

07 JAN 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सावित्रीबाई फुले वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या आद्य महिला सुधारक

## डॉ. माणिकराव साळुंखे; शिवाजी विद्यापीठात महिला शास्त्रज्ञांविषयी कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी केलेल्या कार्यामुळेच आजच्या महिलांमध्ये आत्माभिमान जागृत झाल्याचे दिसते. त्या वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या आद्य महिला समाजसुधारक होत्या, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे स्त्री अभ्यास केंद्र, शिक्षणशास्त्र अधिविभाग, विद्यार्थिनी वसतिगृह, बेटी बचाओ अभियान, विद्यार्थी विकास विभाग, अंतर्गत तक्रार निवारण समिती आणि श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन यांच्या संयुक्त विद्यमाने सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्ताने 'शिवाजी विद्यापीठातील महिला शास्त्रज्ञ' या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळा सोमवारी राजर्षी शाहू सभागृहात आयोजित करण्यात आली. त्यावेळी बीजभाषण करताना ते बोलत होते.

डॉ. साळुंखे म्हणाले, सावित्रीबाई फुले या बुद्धीवादी आणि बुद्धीप्रामाण्यवादी विचारवंत होत्या. त्यांच्याविषयी प्रत्येक महिलेने कृतज्ञ असले पाहिजे. कृत्रिम बुद्धिमत्ता माणसाला पर्याय ठरू शकत नाही; मात्र त्यासाठी त्याकडे वेगळ्या दृष्टीने पाहायला हवे. त्यासाठी ग्रंथालयांचा जास्तीत जास्त वापर केला पाहिजे.



कार्यशाळेत बोलताना माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे.

अध्यक्षीय मनोगतात प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव म्हणाल्या, सावित्रीबाई फुले या केवळ शिक्षिकाच नव्हत्या, तर कवयित्री, शास्त्रज्ञ, प्लेगच्या साथीत लोकांना आधार देणाऱ्या सेवाभावी परिचारिकाही होत्या. त्यांच्या कार्यकर्तृत्वाच्या प्रेरणेतूनच व्यक्तिगत पातळीवर माझ्यात शिक्षण घेण्यासाठी संघर्ष करण्याची ऊर्मी निर्माण झाली.

कार्यक्रमात महिला संशोधक डॉ. ज्योती जाधव, डॉ. पद्मा दांडगे, डॉ. वर्षा जाधव, डॉ. माधुरी वाळवेकर, डॉ. कविता ओझा आणि डॉ. आसावरी जाधव यांचा डॉ. साळुंखे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सुरुवातीला क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले. डॉ. निशा मुडे-पवार यांनी प्रास्ताविक केले. डॉ. भारती पाटील यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला. धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. प्रतिभा देसाई यांनी आभार मानले. कार्यक्रमास डॉ. तानाजी चौगुले, डॉ. चेतना सोनकांबळे, डॉ. रामचंद्र पवार आदी उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

07 JAN 2026
तरुण भारत



कोल्हापूर : कार्यशाळेत बोलताना माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे सोबत प्रभारी प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, डॉ. निशा मुडे–पवार, डॉ. चेतना सोनकांबळे आदी.

# सावित्रीबाईंमुळे महिलांमध्ये आत्माभिमान जागृत

**▪ माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे**

**▪ शिवाजी विद्यापीठात महिला शास्त्रज्ञांविषयी कार्यशाळा**

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले या बुद्धीवादी आणि बुद्धीप्रामाण्यवादी विचारवंत होत्या. त्यांनी केलेल्या कार्यामुळेच आजच्या महिलांमध्ये आत्माभिमान जागृत झाले आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे स्त्री अभ्यास केंद्र, शिक्षणशास्त्र अधिविभाग, विद्यार्थिनी वसतिगृह, बेटी बचाओ अभियान, विद्यार्थी विकास विभाग, अंतर्गत तक्रार निवारण समिती आणि श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन यांच्या संयुक्त विद्यमाने सावित्रीबाई फुले जयंती निमित्ताने आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. 'शिवाजी विद्यापीठातील महिला शास्त्रज्ञ" या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव होत्या.

प्रभारी प्र–कुलगुरू डॉ. जाधव म्हणाल्या, सावित्रीबाई फुले या केवळ शिक्षिकाच नव्हत्या, तर कवयित्री, शास्त्रज्ञ, प्लेगच्या साथीत लोकांना आधार देणाऱ्या सेवाभावी परिचारिकाही होत्या. महिलांनी मातृत्व आणि कर्तृत्व यांचा समतोल साधून राष्ट्रीय योगदान देण्यास सिद्ध झाले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमात विद्यापीठातील आघाडीच्या महिला संशोधक डॉ. ज्योती जाधव, डॉ. पद्मा दांडगे, डॉ. वर्षा जाधव, डॉ. माधुरी वाळवेकर, डॉ. कविता ओझा आणि डॉ. आसावरी जाधव यांचा गौरव करण्यात आला.

डॉ. निशा मुडे–पवार यांनी स्वागत केले. डॉ. भारती पाटील यांनी परिचय करून दिला. धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. प्रतिभा देसाई यांनी आभार मानले. यावेळी डॉ. तानाजी चौगुले, डॉ. चेतना सोनकांबळे, डॉ. रामचंद्र पवार आदी उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 JAN 2026
जनप्रवास

# पर्यावरण संवर्धनाशिवाय उद्याचा विचार अशक्य

## कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे प्रतिपादन

**जनप्रवास : कोल्हापूर**

कोल्हापुरात पर्यावरण संरक्षण काळाची गरज आहे. पर्यावरण संवर्धनाशिवाय उद्याचा विचार अशक्य, आहे, असे प्रतिपादन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र अधिविभाग मार्फत ५ ते ९ जानेवारी या कालावधीत "पर्यावरण जागृती कार्यक्रम" या अभ्यासक्रम उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते.

कुलसचिव डॉ. शिंदे म्हणाले, पर्यावरणीय आव्हाने- ज्यामध्ये बदललेल्या पीक पद्धती, नगदी पिकांमुळे जैवविविधतेचा होणारा ऱ्हास, मातीची धूप, रासायनिक खतांचा वापर आणि जलस्रोतांचा ऱ्हास यासारखे गंभीर पर्यावरणीय परिणाम, गेल्या दोन दशकांतील भूगर्भातील पाण्याचा अतिरिक्त उपसा केल्यामुळे झुकलेला पृथ्वीचा अक्ष, भारतातील नियमबाह्य कूपनलिकांचे वाढलेले प्रमाण, पश्चिम महाराष्ट्रतील जैव-विविधता, वाढत असेलेले प्रदूषण आणि ते थांबवण्यासाठी एक सजग नागरिक म्हणून समाजातील प्रत्येक घटकांची भूमिका, भारतीय वृक्षांचे पर्यावरण, संस्कृती आणि आरोग्याच्या दृष्टीने अनमोल महत्त्व, आदी विषयावर मार्गदर्शन केले.



विद्यापीठात मार्गदर्शन करताना डॉ. व्ही. एन. शिंदे.

डॉ. प्रतिमा पवार यांनी मनोगत व्यक्त केले. स्वागत व प्रास्ताविक डॉ. प्रल्हाद माने यांनी केले. पाहुण्यांची ओळख डॉ. प्रतिभा देसाई यांनी करुन दिली. आकाश ब्राम्हणे यांनी आभार मानले. डॉ. मयूरेश पाटील यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी विद्यार्थी व संशोधक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner

0 7 JAN 2026 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पत्रकारांकडून कृत्रिम बुद्धिमत्तेचा सजग वापर आवश्यक : डॉ. मोरे

## पत्रकार दिनानिमित्त दहा विद्यापीठांचे ऑनलाईन व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

मुद्रणकलेनंतर जर कोणती मोठी क्रांती झाली असेल तर ती कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाची आहे. पत्रकारितेत अनेक नवे प्रयोग झाले असले, तरी मानवी मेंदूला टक्कर देण्याची क्षमता असलेली कृत्रिम बुद्धिमत्ता ही संवेदनशील बाब आहे. याचा वापर पत्रकारांनी अधिक सजगता आणि विचारपूर्वक करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे यांनी केले.

मराठी पत्रकार दिनानिमित्त महाराष्ट्रातील दहा विद्यापीठांच्या जनसंवाद व पत्रकारिता विभागातर्फे 'कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि माध्यमे' या विषयावर मंगळवार (दि. ६) रोजी विशेष ऑनलाईन व्याख्यानप्रसंगी ते बोलत होते. डॉ. मोरे म्हणाले, कृत्रिम बुद्धिमत्तेचा शोध अनेक वर्षांपूर्वी लागला असला तरी सध्या तिचा वापर सर्वच क्षेत्रांत झपाट्याने वाढत आहे. प्रत्येक तंत्रज्ञानाला जसे सकारात्मक व नकारात्मक पैलू असतात तसेच एआयचेही आहेत. त्यामुळे पत्रकारांनी एआय-साक्षर होत या तंत्रज्ञानाचा विवेकपूर्ण वापर करणे गरजेचे आहे.

ज्येष्ठ पत्रकार डॉ. धनंजय बिजले, प्रा. योगेश बोराटे यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. निशा मुडे-पवार, डॉ. राम भावसार, डॉ.संजय तांबट, डॉ. माधवी रेड्डी, डॉ. दिनकर माने, डॉ. सुहास पाठक, डॉ. प्रभाकर कोळेकर, डॉ. प्रबास साहू, डॉ. सुंदर राजदीप, मीरा देसाई व प्रा. डॉ. सरफराज अन्सारी यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संजय तांबट यांनी केले. डॉ. तेजस्विनी कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. गोपी सोरडे यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी डॉ. वृषाली बर्गे, डॉ. मनीषा मोहोड, रोहित देशमुख यांनी परिश्रम घेतले.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 JAN 2026
लोकमत

# पत्रकारांकडून कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर आवश्यक

## डॉ. सदानंद मोरे: मराठी पत्रकार दिनानिमित्त व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** मुद्रणकलेनंतर जर कोणती मोठी क्रांती झाली असेल, तर ती कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाची आहे. पत्रकारितेत अनेक नवे प्रयोग झाले असले, तरी मानवी मेंदूला टक्कर देण्याची क्षमता असलेली कृत्रिम बुद्धिमत्ता ही अत्यंत संवेदनशील बाब असून, तिचा वापर पत्रकारांनी अधिक सजगता आणि विचारपूर्वक करावा, असे आवाहन ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे यांनी मंगळवारी केले.

मराठी पत्रकार दिनानिमित्त महाराष्ट्रातील दहा विद्यापीठांच्या जनसंवाद व पत्रकारिता विभागातर्फे 'कृत्रिम बुद्धिमत्ता आणि माध्यमे' या विषयावर विशेष ऑनलाइन व्याख्यानात ते बोलत होते. हे सहावे वर्ष होते.

डॉ. मोरे म्हणाले, कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर सध्या सर्वच क्षेत्रांत झपाट्याने वाढत आहे. प्रत्येक तंत्रज्ञानाला जसे सकारात्मक व नकारात्मक पैलू असतात, तसेच एआयचेही आहेत. पत्रकारांनी एआय-साक्षर होत या तंत्रज्ञानाचा विवेकपूर्ण वापर करणे गरजेचे आहे. ज्येष्ठ पत्रकार डॉ. धनंजय बिजले म्हणाले, एआयमुळे बातम्यांमध्ये साचेबद्धता वाढण्याचा धोका आहे. वृत्तपत्रांच्या मांडणी, मुद्रितशोधन, तसेच आकर्षक शीर्षकासाठी एआयचा फायदा होत असला, तरीही चुकीची माहिती प्रसारित होण्याचा धोका वाढल्याने फॅक्ट-चेकिंगला महत्त्व देणे आवश्यक आहे. प्रा. योगेश बोराटे म्हणाले, एआयचा उपयोग केवळ मजकूरनिर्मितीपुरता न ठेवता बहुआयामी पद्धतीने शोध पत्रकारितेसाठीही करता येऊ शकतो. डॉ. संजय तांबट यांनी प्रास्तविक केले. डॉ. तेजस्विनी कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. गोपी सोरडे यांनी आभार मानले. डॉ. वृषाली बर्गे, डॉ. मनीषा मोहोड, रोहित देशमुख यांनी परिश्रम घेतले.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

07 JAN 2026

जनप्रवास

# बौद्धिक हक्काचे संपादन काळाची गरज : राशीनकर

**कोल्हापूर :** कोणतीही सर्जनशीलता नावीन्यपूर्णरित्या जेव्हा प्रत्यक्ष रूपात अवतरते तेव्हा त्या कर्त्याला स्वामित्व हक्क प्राप्त होतो. बौद्धिक हक्क संपादन करणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन डॉ. गजानन राशीनकर यांनी केले.



मराठी विभागातर्फे आयोजित 'स्वामित्व हक्क : काही नव्या दिशा' या विषयावर व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ राजकीय विश्लेषक डॉ. प्रकाश पवार होते.

डॉ. राशीनकर म्हणाले, आजच्या एआयच्या जमान्यात याकडे आपल्या हक्काची बाब म्हणून गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे. डॉ. पवार म्हणाले, कल्पनांना स्वामित्व हक्क नाहीत; पण आजचा तुमचा विचार उद्या एका नव्या जगात घेऊन जाणारा ठरणार आहे. प्रा. नंदकुमार मोरे यांच्या 'असे होते आपले शाहू महाराज' या पुस्तकाला स्वामित्व हक्क मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार केला. प्रास्ताविक प्रा. रणधीर शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन भक्ती नाईक यांनी केले. आभार ज्योती वराळे यांनी मानले. यावेळी डॉ. सुखदेव एकल, विमल मोरे, डॉ. कोळेकर व संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 JAN 2026

लोकमत

# बौद्धिक हक्काचे संपादन काळाची गरज : राशीनकर

**कोल्हापूर** : बौद्धिक हक्क संपादन करणे ही आजच्या काळाची महत्त्वाची गरज असल्याचे प्रतिपादन डॉ. गजानन राशीनकर यांनी केले. मराठी विभाग आयोजित 'स्वामित्व हक्क : काही नव्या दिशा' या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ राजकीय विश्लेषक डॉ. प्रकाश पवार होते. ते म्हणाले, कल्पनांना स्वामित्व हक्क नाहीत; पण आजचा तुमचा विचार उद्या एका नव्या जगात घेऊन जाणारा ठरणार आहे. यावेळी प्रा. नंदकुमार मोरे यांच्या 'असे होते आपले शाहू महाराज' या पुस्तकाला स्वामित्व हक्क मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. प्रा. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. भक्ती नाईक यांनी सूत्रसंचालन केले.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 JAN 2026

तरुण भारत

# डॉ. आनंद पाटील यांच्याकडून विद्यापीठास देणगी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृह योजनेसाठी प्रख्यात तुलनाकार प्रा. डॉ. आनंद बाळू पाटील–संकपाळ यांनी आपल्या मातोश्रींच्या नावे ३ लाख २५ हजार रुपयांची देणगी दिली आहे. दातृत्वाच्या देणगातून शिवाजी विद्यापीठाच्या परिसरात लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृह साकारले आहे. डॉ. पाटील यांनी आपल्या मातोश्री कै. आक्काबाई बाळू पाटील–संकपाळ यांच्या नावे निवासी कक्ष उभारण्यासाठी ३ लाख २५ हजारांची देणगी दिली. देणगीचा धनादेश त्यांनी आज विद्यापीठाच्या प्रभारी प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्याकडे सुपूर्द केला. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, गीता पाटील डॉ. मंगेश पाटील उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 JAN 2026

दै. जनप्रवास

# डॉ. आनंद पाटील यांच्याकडून विद्यापीठास सव्वातीन लाखांची देणगी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृह योजनेसाठी प्रख्यात तुलनाकार प्रा. डॉ. आनंद बाळू पाटील-संकपाळ यांनी आपल्या मातोश्रींच्या नावे ३ लाख २५ हजार रुपयांची देणगी दिली. दातृत्ववान नागरिकांच्या देणगीमधून शिवाजी विद्यापीठाच्या परिसरात दुमजली लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृह साकारले आहे. या वसतिगृहाच्या विस्तारीकरणाचे कामही प्रगतीपथावर आहे. या कार्यासाठी डॉ. पाटील यांनी आपल्या मातोश्री कै. आक्काबाई बाळू पाटील-संकपाळ यांच्या नावे निवासी कक्ष उभारण्यासाठी ३ लाख २५ हजारांची देणगी दिली. देणगीचा धनादेश त्यांनी विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्याकडे सुपूर्द केला. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, गीता पाटील, डॉ. मंगेश पाटील उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 7 JAN 2026
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाकडून ४२३ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर- नोव्हेंबर हिवाळी सत्रातील आजअखेर ४२३ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत.

विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालयात पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. मंगळवारी एमबीए., एमजे., एम.कॉम आदी तीन अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध सात केंद्रांवर झाल्या. परीक्षेला १७४ विद्यार्थी उपस्थित होते. दि. ६ रोजी एम.एस्सी. (झुलॉजी) बीए. च्या विविध सत्रांचे निकाल जाहीर करण्यात आले. विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रणासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

Scanned with OKEN Scanner

07 JAN 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात सामाजिक बदलांबाबत कार्यशाळा उत्साहात

**कोल्हापूर :** पी. एम. उषा अंतर्गत 'भारतातील सामाजिक बदल' या विषयावर आयोजित एकदिवसीय कार्यशाळा उत्साहात झाली. अध्यक्षस्थानी डॉ. आर. जी. कुलकर्णी होते.

शिवाजी विद्यापीठाचे कॉ. दत्ता देशमुख अभ्यास केंद्र, कॉलेज ऑफ नॉन कॉन्वेन्शनल व्होकेशनल कोर्सेस फॉर वूमन आणि नेहरू स्टडी सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. याचे उद्घाटन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठमधील संत तुकाराम महाराज अध्यासनाचे अध्यक्ष डॉ. अभय टिळक, शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. प्रकाश पवार, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते झाले. पहिल्या सत्रात डॉ. अभय टिळक, दुसऱ्या सत्रात ज्येष्ठ राजकीय विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर, तिसऱ्या सत्रात ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत डॉ. सुनीलकुमार लवटे, संदीप पाटील यांनी विचार मांडले. दुसऱ्या सत्राचे अध्यक्ष श्रीरंग गायकवाड होते. यावेळी रितिका चंद्वानी, ज्योती हिरेमठ, अनुराधा कुंभार, उमेमासिरा रहिमतपुरे, अलका वाडकर आदी उपस्थित होत्या.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 JAN 2026

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात नवीन कामगार संहितावरील कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट, अर्थशास्त्र विभाग– स्वाय्यत्त तसेच उद्योजकता व कौशल्य विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने, पी एम उषा (सॉफ्ट कॉम्पोनन्ट ऍक्टिव्हिटी अंतर्गत) व रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी यांच्या सहकार्याने नवीन कामगार संहिता व त्याचे व्यवस्थापकीय परिणाम या विषयावर व्यवस्थापन विकास कार्यक्रम कार्यशाळा झाली. डॉ. संतोष भावे, माजी एच. आर भारत फोर्ज, प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. 'नवीन कामगार संहिता अंमलात आली असून, एच.आर व व्यवस्थापकांनी ती संघटनांमध्ये विलंब न करता सक्रियपणे अंमलात आणण्यासाठी सज्ज राहिले पाहिजे, असे डॉ. भावे यांनी सांगितले. डॉ. नितीन माळी यांनी स्वागत केले. डॉ. महादेव देशमुख यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे संयोजक डॉ. दिग्विजय पाटील व प्रा. प्रताप खोत होते. सूत्रसंचालन अर्पिता विद्गूरकर यांनी केले, डॉ. आर. जी. पवार यांनी आभार मानले.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 JAN 2026
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागाच्या वतीने शुक्रवारी (दि. ९) 'लेखक संवाद' या कार्यक्रमांतर्गत मराठीतील कवी, कादंबरीकार मनोज बोरगावकर यांच्याशी मुक्त संवादाचे आयोजन करण्यात आले आहे. रामानुजन सभागृह, गणित विभाग येथे सकाळी ११.३० होणाऱ्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे असणार आहेत. मनोज बोरगावकर यांची 'नदीष्ट' ही कादंबरी वेगळे अनुभवविश्व वाचकांसमोर मांडते. कार्यक्रमाच्या निमित्ताने मनोज बोरगावकर यांच्या लेखनाच्या निर्मिती प्रक्रियेचा शोध घेतला जाणार आहे. कार्यक्रमासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी केले.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 JAN 2026
दै. जनप्रवास

# एमफिल, पीएच. डी. परीक्षांना १९ पासून प्रारंभ

कोल्हापूर : शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील ऑक्टो./नोव्हे. २०२५ हिवाळी सत्रातील एम. फिल. / पीएच. डी. कोर्सवर्क अभ्यासक्रमाच्या परीक्षेला १९ जानेवारीपासून प्रारंभ होणार आहे. तरी महाविद्यालय, अधिविभागातील सर्व शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थ्यांना याची माहिती द्यावी, असे आवाहन शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने केले आहे.

Scanned with OKEN Scanner

0 7 JAN 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ज्ञान आणि विज्ञान!



## ज्ञान-विज्ञान

डॉ. व्ही.एन. शिंदे

**ज्ञानाचा वापर करताना वैज्ञानिक दृष्टिकोन जपायला हवा. केवळ स्वतःचा विचार पृथ्वीवरील जीवसृष्टीसाठी घातक ठरत आहे. ज्ञान विज्ञानातील घडामोडीचा आणि त्यांचे परिणाम सांगणारे हे सदर.**

पृथ्वी विश्वातील एक सुंदर ग्रह. अजून तरी या ग्रहाला दुसरा कोणी स्पर्धक भेटलेला नाही. पृथ्वीची निर्मिती एका ताऱ्याच्या स्फोटातून झाली. त्यातून ग्रहांची आणि उपग्रहांचीही निर्मिती झाली. मूळ तप्त वायूचा गोळा मोठ्या आकारात राहिला. त्याभोवती स्फोटात तयार झालेले लहान गोळे फिरू लागले. त्यांनी स्वतःचा तप्तपणा सोडून देण्यास सुरुवात केली. त्यातील उष्मा बाहेर गेल्यानंतर त्यांना घनावस्था प्राप्त होऊ लागली. यात पृथ्वी अन्य ग्रहांपेक्षा वेगळीच घडत गेली. त्यामध्ये घनावरण म्हणजेच भूकवच तयार झाले. पृथ्वीच्या पोटात मात्र लाव्हारस तसाच फिरत राहू लागला. त्याचसोबत तो अधूनमधून ज्वालामुखीच्या रूपात बाहेर पडू लागला. त्यातून उंच पर्वत आणि खोल खड्डे तयार झाले. पृथ्वीवर सर्वांत महत्त्वाचा घटक आहे तो म्हणजे पाणी. या पाण्याने जीवसृष्टीची निर्मिती केली. मुळात जीवसृष्टीची सुरुवातच पाण्यात झाली. पहिला जीव नेमका कसा जन्मला? हे कोडे आजही सुटलेले नाही. मात्र, एका अशा घटनेमध्ये अमिबा हा एकपेशीय जीव तयार झाला. त्याचे आजही विभाजन होऊन पुनरूत्पादन होते. अमिबा पहिला जीव असेच आजतरी मानले जाते. पुढे त्यापासून पाण्यामध्ये इतर जीव तयार झाले. शैवाल बनले. जलचर प्राणी आणि वनस्पती तयार झाल्या. भूचरांमध्ये प्राणी, पक्षी तसेच गवत, झुडपे, वेली आणि वृक्ष तयार झाले. यातील प्राण्यांतून पुढे माकड, वानर, चिंपाझी, गोरीला असे मानवाच्या जवळचे प्राणी उत्क्रांत पावले. मानव त्यातूनच पुढे घडत गेला. मानवाचे पूर्वजही सुरुवातीला चार पायांवर चालत. झाडांची पाने, फळे, कंदमुळे खात. अन्न, पाणी आणि हवा याच त्यांच्या मूलभूत गरजा होत्या. सगळे काही व्यवस्थित सुरू होते. पुढे मानवाने आपल्या मेंदूचा वापर सुरू केला. त्यातून प्रथम वस्ती करण्याचा निर्णय घेतला. त्याने आपल्या कायमस्वरूपी वस्तीसाठी नदी किनारे निवडले. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे, नदीकिनारी जीवनावश्यक असणारे पाणी मुबलक उपलब्ध होत होते. एका ठिकाणी वास्तव्य करण्यास सुरुवात केल्यानंतर त्याला निवांतपणा मिळू लागला. त्यातून त्याने निरीक्षण करण्यास सुरुवात केली. निसर्गात घडणाऱ्या घटना का घडतात, हे जाणून घेण्याचे कुतूहल त्याच्या मनात निर्माण झाले. त्या घटना का घडतात, कशा घडतात हे समजून घेण्यासाठी तो विचार करू लागला. यातून तो ज्ञानसंपन्न बनू लागला. समर्थ रामदासांच्या उक्तीनुसार 'जे जे आपणाशी टावे, ते ते इतरांसी सांगावे..', हे विचारवंत आपणास उमगलेले इतरांना सांगत राहिले. पुढे या विचारवंतांना, विद्वान मानले जाऊ लागले. त्यांनी सांगितलेले इतर लोक ऐकू लागले. सुरुवातीला केवळ निसर्गात घडणाऱ्या घटनांचे आकलन करून घेण्यासाठी विचारवंतांचे प्रयत्न सुरू होते. यातून तत्त्वज्ञान हा विषय तयार झाला. तत्त्वज्ञानाची व्याप्ती वाढू लागल्याने यातून निसर्ग विज्ञान वेगळे झाले.

लेख ऐकण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

निसर्ग विज्ञानातून पुढे विविध शास्त्रांची निर्मिती झाली. जीवशास्त्र, रसायनशास्त्र तयार झाले. भौतिकशास्त्रातील संशोधन मात्र जितके संशोधन होईल, तितकी नवी संशोधनाची दारे उघडत राहिले. दुसरीकडे तत्वज्ञानातून राज्यशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र असे अनेक अभ्यासाचे विषय आज तयार झालेले आपणास दिसतात. कालौघात जे काही अभ्यासांती अभिजात मिळेल, ते ते इतरांना सांगत आल्याने पूर्वीच्या लोकांनी, प्रयोगातून, चिंतनातून मिळवलेले ज्ञान माहितीच्या रूपात पुढच्या पिढीला उपलब्ध होत राहिले. हे ज्ञान प्रामुख्याने माहितीच्या रूपात तथ्ये आणि आकडेवारीच्या रूपात उपलब्ध होत असते. ही माहिती दररोज वाढत आहे. माहितीचे भांडार एवढे विस्तारत गेले आहे की केवळ एका विषयाची समग्र माहिती वाचायची ठरवले तरी कित्येक वर्षे जातील, त्यामुळे या माहितीचे विश्लेषण करण्यासाठी पुढे अनेक युक्त्या शोधण्यात आल्या. मात्र, पूर्वीच्या लोकांच्या आकलनातून उपलब्ध झाले ते पुढच्या पिढीला उपलब्ध होते ते, माहितीच्या रूपात. या माहितीचे ज्ञानात रूपांतर होण्यासाठी योग्य माहितीचे वाचन करणे, ही ज्ञान संपादनातील पहिली पायरी असते. वाचनातून आपणास वस्तुस्थिती, आकडेवारी, तपशील हे सर्व काही उपलब्ध असते. हे वाचताना आपणास त्या गोष्टीबद्दलची जाणीव होते. कोणत्याही साहित्याचे वाचन करताना त्यातील महत्त्वाचा भाग आपल्या मेंदूमध्ये साठवून ठेवणे गरजेचे असते. आज माहिती केवळ पुस्तकातच नाही तर इंटरनेट, संगणक, दूरदर्शन, मोबाईल इत्यादी साधनांतून आपणास उपलब्ध होते. आपण वाचनातून केवळ पुस्तकातील माहिती आपल्या मेंदूमध्ये साठवत असतो. माहितीचे ज्ञानात रूपांतर होण्यासाठी माहितीचा अर्थ समजून घेण्याची गरज असते. मानवाकडे ही माहिती वापरण्याची क्षमता येण्यासाठी माहितीचे ज्ञानात रूपांतर होण्याची गरज असते, त्यासाठी एखादी घटना काय आहे, ही माहिती आपणास सांगत असते. माहितीचे ज्ञानात रूपांतर होण्यासाठी घटना कशी घडते, का घडते याचे आकलन करून घेणे गरजेचे असते. त्यासाठी चिंतन करावे लागते. मेंदूमध्ये साठवलेल्या माहितीतून विशिष्ट घटना का आणि कशी घडते हे समजून घेतल्यानंतर माहितीचे ज्ञानात रूपांतर होते. माहिती हे ज्ञानाचे साधन आहे, साध्य नाही. ज्ञान चिंतन आणि अनुभवातून प्राप्त होत असते. माहितीचे विश्लेषण करून अनुभव आणि आकलनाची त्याला जोड देऊन मिळालेली समज, कौशल्य आणि जागरूकता म्हणजे ज्ञान. ज्ञान आपणास ज्ञात असलेल्या गोष्टीचा वापर करण्याची क्षमता देते. ही क्षमता आल्यानंतर पुढचा टप्पा येतो तो संशोधनाचा. संशोधन सुरू होते, ते बहुतांश वेळा आपण वाचलेल्या माहितीचे; आपणास जे आकलन झाले त्याची पडताळणी करण्यासाठी. प्रयोगाच्या सहाय्याने माहितीची पडताळणी केली जाऊ लागली. ग्रह, सूर्य, तारे, निसर्गात आढळणाऱ्या घटना यांच्या पुढे जात मानवाने अनेक पदार्थ कशाचे बनले आहेत, ती घटना का, कशी घडते हे जाणून घेत मांडणी करायला सुरुवात केली. थंडीमध्ये लोकरीचे कपडे घालावेत, आजचे तापमान कमी आहे, ही माहिती असते. मात्र, तापमान कमी असताना लोकरीचे कपडे घालणे म्हणजेच ज्ञानाचे उपयोजन. यामध्ये आजचे तापमान का कमी झाले, किती कमी झाले, या सर्व गोष्टींचे आकलन आपणास विज्ञानाच्या सहाय्याने करून घेता येते. माहिती ज्ञानाच्या उपलब्धतेसाठी गरजेची आहे, ज्ञान नव्या समस्यांची जाणीव होण्यासाठी आणि त्या समस्येची उकल करण्यासाठी महत्त्वाचे असते. ज्याकाळी नियमांची मांडणी नव्हती, त्या काळातही छत्रपती शिवाजी महाराजांनी ध्वनी, प्रकाश ऊर्जेचा वापर संदेश वहनासाठी कल्पकतेने केला होता, त्यामुळेच त्यांचे ज्ञान चौफेर मानले जाते. या दृष्टीने या सदरामध्ये एखाद्या घटनेमागील माहिती सांगण्याबरोबर त्यामागील ज्ञान आणि विज्ञानाची मांडणी असणार आहे.

vilasshindevs44@gmail.com
संपर्क : ९६७३७८४४००

Scanned with OKEN Scanner

07 JAN 2026 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिंदे महाविद्यालयाचे सावर्डेत श्रमसंस्कार शिबिर

## विविध विषयांवर व्याख्याने; आरोग्य तपासणी, रक्तदान शिबिर

**सकाळ वृत्तसेवा**

साळवण, ता. ६ : शिवाजी विद्यापीठ व म. ह. शिंदे महाविद्यालय, तिसंगी यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे 'जलसंधारण व ओसाड जमिनीचा शाश्वत विकास' या संकल्पनेवर आधारित विशेष श्रमसंस्कार निवासी शिबिर मौजे सावर्डे तर्फ असंडोली (ता. पन्हाळा) येथे झाले.

शिबिराचे उद्घाटन उपसरपंच शिल्पा बच्चे, प्रमुख पाहुणे कळे पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक दीपक कदम यांच्या हस्ते रोपास पाणी घालून केले. शिवाजी सातपुते, मारुती पाटील, महादेव पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. शिबिर काळात विविध सामाजिक उपक्रम राबविले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी संस्थापक पी. जी. शिंदे, सचिव स्वप्नील शिंदे आणि प्राचार्य डॉ. आर. एस. पोंदे यांचे मार्गदर्शन लाभले.



सावर्डे : तिसंगीतील शिंदे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी दीपक कदम, शिल्पा बच्चे, प्राचार्य डॉ. आर. एस. पोंदे आदी.

शिबिरादरम्यान अशोक पाटील यांचे 'आजच्या तरुणांपुढील आव्हाने', डॉ. युवराज मोटे यांचे 'बदलते हवामान आणि शाश्वत शेती', केडीआरएफ कोल्हापूर यांचे 'आपत्ती व्यवस्थापन मार्गदर्शन व प्रात्यक्षिके', गोकुळचे डॉ. दयानंद काळे यांचे 'पशुपालन व दुग्धोत्पादन : अडचणी व उपाय' या विषयावर व्याख्याने झाली. आरोग्य तपासणी आणि रक्तदान शिबिरही झाले. उपक्रमांचा सावर्डे पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी लाभ घेतला.

यावेळी स्पर्धा परीक्षेत यशस्वी झालेल्या स्नेहल गुरव, प्रतीक्षा चौगुले (जलसंपदा विभाग, कालवा निरीक्षक) या मुलींचा सत्कार केला. प्रास्ताविक व स्वागत प्रकल्पाधिकारी प्रा. ए. सी. भोसले यांनी केले. डॉ. डी. एस. पवार यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. एस. एच. तांबोळी यांनी आभार मानले.

Scanned with OKEN Scanner

0 7 JAN 2026

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कॉमर्स–महावीर कॉलेजमध्ये उद्या अंतिम सामना

## आदित्य पाटील, सूरज कोंढाळकरने पटकावला सामनावीरचा बहुमान

**■ शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय क्रिकेट स्पर्धा**

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय पुरुष क्रिकेट स्पर्धेच्या विजेतेपदासाठी गुरुवार ९ रोजी कॉमर्स कॉलेज आणि महावीर कॉलेज या संघांमध्ये अंतिम सामना खेळवला जाणार आहे. शिवाजी विद्यापीठ क्रिकेट मैदानात हा सकाळी ९ वाजता हा सामना होईल. कागल येथील डी. आर. माने महाविद्यालयच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

दरम्यान, स्पर्धेअंतर्गत महावीर कॉलेज आणि ईश्वरपूर (जि. सांगली) येथील आरआयटी इंजिनिअरिंग कॉलेज या संघांमध्ये पहिला उपांत्य सामना झाला. प्रथम फलंदाजी करताना महावीर कॉलेजच्या २० षटकात प्रेम पाटीलच्या ५१, अनुराग पाटीलच्या ४६, आदित्य पाटीलच्या ४६ धावांच्या जोरावर २०६ धावांचा डोंगर उभारला केला. गोलंदाजी करताना आरआयटीकडून समर्थ पाटीलने २ बळी घेतले. प्रत्युत्तरादाखल खेळताना



आरआयटीने २० षटकात १५० धावाच केल्या. त्यामुळे या संघावर महावीर कॉलेजचा ५६ धावांनी विजय होऊन स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश झाला. आरआयटीकडून साईराज पाटीलने २२, आशुतोष देवरेने २८ धावा केल्या. गोलंदाजी करताना महावीर कॉलेजच्या आदित्य पाटीलने ३ बळी घेतले. या सामन्यात अष्टपैलू कामगिरी केलेल्या आदित्य पाटीलला सामनावीर म्हणून गौरवले.

वालचंद कॉलेज ऑफ इंजिनियरिंग आणि कॉमर्स कॉलेज या संघांमध्ये दुसरा उपांत्य सामना झाला. कॉमर्स कॉलेजने प्रथम फलंदाजी करताना २० षटकात विक्रमी २२९ धावा केल्या. कॉमर्स कॉलेजची धावसंख्या द्विशतकी करण्यासाठी सूरज कोंढाळकरने १२२ आणि अनिकेत नलवडेने ६२ धावांचे योगदान दिले. गोलंदाजी करताना वालचंदच्या यशराज पोळ याने २ बळी घेतले. प्रत्युत्तरादाखल खेळताना वालचंद कॉलेजने २० षटकात ९ बाद १३४ धावाच केल्या. त्यामुळे या संघावर ९५ धावांनी विजय झालेल्या कॉमर्स कॉलेजचा अंतिम फेरीत प्रवेश झाला. कॉमर्स कॉलेजच्या सामन्यात विजयी करण्यासाठी १२२ धावांची उत्कृष्ट फलंदाजी केलेल्या सूरज कोंढाळकरला सामनावीर म्हणून सन्मानित केले. दरम्यान, बुधवार ७ रोजी वालचंद कॉलेज ऑफ इंजीनियरिंग व आरआयटी इंजिनिअरिंग कॉलेज संघामध्ये तिसऱ्या क्रमांकासाठी सकाळी ९ वाजता सामना खेळवला जाणार आहे

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 JAN 2026
सकाळ



कोल्हापूर : आंतरविभागीय महिला क्रिकेट स्पर्धेत विजेता महावीर महाविद्यालयाच्या संघासोबत प्राचार्य प्रा. डॉ. अद्वैत जोशी, डॉ. रोहित पाटील.

# आंतरविभागीय क्रिकेट स्पर्धेत महावीर महाविद्यालय अजिंक्य

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ६ : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने आयोजित आंतरविभागीय महिला क्रिकेट स्पर्धेत येथील महावीर महाविद्यालयाच्या संघाने अजिंक्यपद पटकावले. त्यांनी अंतिम सामन्यात कस्तुरबाई वालचंद महाविद्यालय सांगली संघाचा ३९ धावांनी पराभव केला.

शिवाजी विद्यापीठाच्या मैदानावर झालेल्या या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करत महावीर महाविद्यालयाने ७ षटकांत ७७ धावांचे आव्हानात्मक लक्ष्य उभे केले. प्रत्युत्तरादाखल कस्तुरबाई वालचंद महाविद्यालय सांगली संघाला उत्तरार्धात केवळ ३८ धावांपर्यंतच मजल मारता आली. महावीर महाविद्यालयाच्या विजयात रसिका शिंदे, सृष्टी पवार, अर्पिता नायकवडी, ईश्वरी राणे, प्राजक्ता घाटगे व ऋतुजा घबक यांनी अष्टपैलू खेळी करत निर्णायक योगदान दिले.

खेळाडूंना जिमखाना प्रमुख डॉ. रोहित पाटील, प्रा. देवदत्त महात्मे यांचे मार्गदर्शन, तर क्रीडा विभागाचे चेअरमन ॲड. के. ए. कापसे, सचिव मोहन गरगटे आणि प्राचार्य प्रा. डॉ. अद्वैत जोशी यांचे प्रोत्साहन लाभले.

Scanned with OKEN Scanner